महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२१-२२/२०२२/२५५८ दिनांक : ०६.०६.२०२२

06 JUN 2022

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील एनएसपी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या एआयसीटीई शिष्यवृत्ती योजनांची एआयसीटीई पोर्टलवर जाहिर केलेल्या लाभार्थ्यांच्या गुणवत्ता यादीबाबतत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/एआयसीटीई-शिष्य/विकाप/२०२२/१२३ दिनांक २०.०५.२०२२.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या खालील प्रगती व सक्षम (शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून) तसेच स्वनाथ (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून) शिष्यवृत्ती योजनांची महाराष्ट्र राज्यामधील अंमलबजावणीकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नोडल ऑफिस म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. सदर योजना या National Scholarship Portal (NSP) पोर्टलद्वारे (संकेतस्थळ-www.scholarships.gov.in) राबविण्यात येतात व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात येतो व विद्यार्थ्यांची यादी संस्थांच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध करुन देण्यात येते. प्रत्येक वर्षी एनएसपी पोर्टलवर जवळपास ऑगस्ट मध्ये विद्यार्थ्यांकडून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होते व संस्था मार्फत अर्ज तपासणीची अंतिम मुदत जवळपास जानेवारी पर्यंत असते.

**या विभागीय कार्यालयामर्फत वेळोवेळी परिपत्रकाद्वारे विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (MahaDBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची संस्थांना योग्य ती दक्षता घेण्याबाबतची सूचना देण्यात आलेली आहे.**

तरी याबाबत कळविण्यात येते कि, AICTE ची खालील योजनांच्या लाभासाठी मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांची योजना व वर्षनिहाय गुणवत्ता यादी AICTE चे संकेतस्थळ (www.aicte-india.org-->schemes-->students-development-schemes) वर संबंधित योजनांतर्गत जाहित करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Name of scheme |
|---|---|
| 1 | PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS (TECHNICAL DEGREE) |
| 2 | PRAGATI SCHOLARSHIP SCHEME FOR GIRL STUDENTS (TECHNICAL DIPLOMA) |
| 3 | SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT (TECHNICAL DEGREE) |
| 4 | SAKSHAM SCHOLARSHIP SCHEME FOR SPECIALLY ABLED STUDENT (TECHNICAL DIPLOMA) |
| 5 | AICTE – SWANATH SCHOLARSHIP SCHEME (TECHNICAL DIPLOMA) |
| 6 | AICTE – SWANATH SCHOLARSHIP SCHEME (TECHNICAL DEGREE) |

**या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व संबंधित संस्थांना पुनःश्च खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते की,**

१. शासनाच्या कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज मंजूर करतेवेळी, **विद्यार्थी कोणत्याही एकाच शिष्यवृत्ती योजनेचा लाभार्थी असेल** याबाबतची दक्षता स्वतः संस्था प्रमुखांनी घ्यावी.
२. संस्थांनी महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मंजूर करतेवेळी एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेली शिष्यवृत्ती योजनांचे लाभार्थी आहे किंवा कसे याबाबतची खात्री करुनच महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज मंजूर / नामंजूर करावे.
३. महाडीबीटी पोर्टलवर अर्ज नामंजूर / करतेवेळी स्पष्ट कारणासह अर्ज नामंजूर करावे.
४. जर संस्थेतील विद्यार्थ्यांकडून एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनांकरीता अर्ज करण्यात आलेले असतील व संस्था स्तरावरुन एकपेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जांना मंजूरी देण्यात आलेली असेल तर अशा अर्जांबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील व अशा संस्थेविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(मारुती रा. जाधव)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः

१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्रमांक १८) यांना माहितीस्तव.

२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना सदरचे परिपत्रक या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शीत करावे, तसेच महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मंजूर करतेवेळी एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचे लाभार्थी आहे किंवा कसे याबाबतची खात्री करुनच महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मंजूर/नामंजूर करावे. एनएसपी पोर्टलवर राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा अर्ज महाडीबीटी पोर्टलवर संस्थेकडून मंजूर करुन विभागीय कार्यालयास पाठविण्यात आला असेल तर स्पष्ट कारणासह सदर अर्ज नामंजूर (Reject) करावा व याबाबत महाडीबीटी ऑनलाईन अर्ज छाननी पथकातील सर्व सदस्यांना अवगत करावे, तसेच संबंधित संस्थेस विभागामार्फत याबाबतची कारणे दाखवा नोटीस पाठवावी व त्याची प्रत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्रमांक१८) यांना सादर करावी.